गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०१६(मो.प.)/१४/२०१७
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- 22 /०६/२०१७.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-१७१७/प्र. क्र. १५१/पोल-१ अ, दि.२१/०६/२०१७.

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (मोटार परिवहन), संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचे शासन आदेश कळविण्याबाबत.

**-: आदेश :-**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, मधील कलम २२ न (२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (मोटार परिवहन), संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्याबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याव्दारे कळविण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याची नियुक्तीचे ठिकाण | बदलीवरील नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | सचिन प्रभाकर बडे | मध्यवर्ती मोटार परिवहन विभाग, नागपूर शहर | मध्यवर्ती भांडार खरेदी शाखा, विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन कार्यालय, पुणे. |
| २. | नेल्सन पिटर पिंटो | सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन नागपाडा, बृहन्मुंबई (बदली आदेशाधिन) | सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन कार्यशाळा, पुणे. |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत घटक प्रमुखांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून, तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

आ. बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

इ. सदर बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याबाबतच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिका-यांना **व्यक्तिश:** अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी.

ई. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना बदलीवर **विनाविलंब कार्यमुक्त** करुन त्यांनी त्यांच्या

नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उ. सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर पोलीस उपअधीक्षकांकडे सोपवावा.

ऊ. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व दि. १०/०२/१९९१ तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दिनांक १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त, पुणे शहर / नागपूर शहर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे.
अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, नागपाडा, बृहन्मुंबई.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

प्रत :-

जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २, ३-अ, ९, ११, १४-अ, ३६ व ४०.
**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश " **पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन बदल्या**" या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.